महावितरण

# जाहीर सुचना

अधीक्षक अभियंता, महावितरण कार्यालय, ग्रामीण मंडळ औरंगाबाद, प्लॉट क्र. जे–१३ गरवारे स्टेडियम समोर, एम. आय. डी. सी. चिकलठाणा, औरंगाबाद या आस्थापनेवर सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, औरंगाबाद यांच्या सर्वेक्षण अहवालानुसार सन २०२०–२१ करिता प्रशिक्षणासाठी शिकाऊ उमेदवारांच्या विजतंत्री –४५, तारतंत्री –४५, एकुण ९० जागा भरण्यासाठी विजतंत्री/तारतंत्री या व्यवसायात आय. टी. आय. उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिनांक २२.१०.२०२० ते दिनांक ०२.११.२०२० सायं ५:३० वाजेपर्यंत **www.apprenticeship.gov.in** या संकेतस्थळावर आस्थापना क्र.E03182700429 वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. दिनांक ०२.११.२०२० नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**टिप:** अर्ज करावयाची शेवटची तारीख दिनांक ०२.११.२०२० रोजी सायं ०५:३० पर्यंतची राहील. उमेदवाराने **www.apprenticeship.gov.in** या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. अर्ज सादर करतांना संकेत स्थळावर आवश्यक ते प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व संबंधीत कागदपत्रांची (शैक्षणिक प्रमाणपत्र– आयटीआय गुणपत्रक व सनद, एसएससी सनद, जातीचा दाखला, आधारकार्ड, ई.) साक्षांकीत छायांकित प्रत दिनांक ०२.११.२०२० पर्यंत महावितरण मंडळ कार्यालय ग्रामीण औरंगाबाद, प्लॉट क्र. जे–१३ गरवारे स्टेडियम समोर, एम. आय. डी. सी. चिकलठाणा, औरंगाबाद येथे प्रत्यक्ष सादर करावी. शैक्षणिक व इतर कागदपत्रांची साक्षांकीत छायांकित प्रत सादर न करणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा राहील. निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारास प्रशिक्षण कालावधीत नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.